**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

**प्रेस नोट दि.२२/०७/२०१८**

**दि.२१/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ४८५/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | श्रीमती.भागिरथी पांडुरंग महानोर,वय-४५ वर्षे,रा.मोरेवस्ती,चिखली,पुणे |
| **आरोपी** | बसवरील चालक- लक्ष्मण निनाजी दाबेराव,रा.नेवाळे वस्ती,चिखली,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०१८ रोजी २०/०० ते ०८/१५ वा. चे दरम्यान वक्रतुंड हॉटेल समोरील रोडवर साने चौक चिखली,पुणे याठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती पांडुरंग रामराव महानोर,वय-६० वर्षे,रा.मोरेवस्ती,चिखली,पुणे हे पायी जात असताना,यातील नमुद बस चालकाने त्याचे ताब्यातील बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पांडुरंग रामराव महानोरयांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. (पांडुरंग महानोर यांचेवर उपचार चालु असताना ते दि.०२/०७/२०१८ रोजी उपचारा दरम्यान मयत झाले.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.एम.भोये ९९६९४२९७२८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ४०७/१८,भादविक ४९८(अ),३०६,३४,३२३ ५०४ ५०६,३४ सह ३(२),नळबळी व जादुटोणा प्रतिबंधक कायदा |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२१,रा.चंदननगर,पुणे |
| **आरोपी** | एकुण दोन इसम व तीन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०८/२०१५ पासुन ते १९/०७/२०१८ रोजीचे दरम्यान लक्ष्मीनगर गल्ली नं.५,कोंढवा,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे एकाच कुटुंबातील असुन,सदर इसम व महिला यांनी आपसात संगनमत करुन,फिर्यादीस माहेरुन पाच तोळे सोने व गृहपोयगी वस्तु आणण्यास सांगुन,फिर्यादीस वारंवार शिवीगाळ हाताने मारहाण करुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ करुन,तीचे वडीलांनी दिलेले लग्नातील दागिने काढुन घेवुन,फिर्यादी यांना हैद्राबाद या ठिकाणी नेवुन,त्यांना भुतबाधा झाली आहे असे सांगुन,एका तांत्रिकाला बोलावुन घेवुन त्यांचे कडुन तंत्र-मंत्र करून,फिर्यादीस त्या ठिकाणी जीवे मारण्याची धमकी देवुन,त्यांचे अंगावरील सोन्याचे दागिने,मोबाईल व पैसे काढुन घेवुन तीस हाकलुन दिले आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. गायकवाड ८१०८३६९२९२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ३६६/१८,भादविक ३५३,३३२,५०४,३४ |
| **फिर्यादी** | विकी कदम, पो.शि. हिंजवडी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | निशांत बाबुराव वाकडकर,वय-३५,रा.वाकडवस्ती,वाकड,पुणे २.सागर मोहन निकम,वय-२२ रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०७/२०१८ रोजी १९/५० वा. इस्कोटिव्ह इन सोसायटी समोर वाकड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पो स्टे चे हद्दीत गुन्हे प्रतिबंध करणेकामी पेट्रालिंगचे सरकारी काम करीत असताना,यातील नमुद इसमाने अंधाराचा फायदा घेवुन एका कार मध्ये येत असताना,फिर्यादी यांनी त्यास थांबण्याचा इशारा करताच त्याने त्याची कार न थांबविता फिर्यादी यांचे अंगावर घालुन त्यांना धक्का-बुक्की व मारहाण करून,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण कला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वाय जी रामेकर ९८८१२५३९६१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८३६/१८,भादविक ४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | वरुणेश भट्टाचार्य,वय-३२ वर्षे,रा.फुरसुंगी,पुणे |
| **आरोपी** | बँकेतील खातेधारक, मोबाईल व ई-मेलधारक अज्ञात व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०२/२०१६ ते जानेवारी २०१७ रोजीचे कालावधीत फिर्यादी यांचे राहते घरी व कामाचे ठिकाणी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद बँकेतील खातेधारक, मोबाईल व ई-मेलधारक व्यक्तींनी आपसात संगनमत करुन,एक खाजगी पॉलीसी कंपनीचे बोनस पॉईंट देण्याचे व त्यांनी भरलेली इन्सुरन्सची रक्कम परत देण्याचे आमिष दाखवुन,फिर्यादी यांचेकडुन वेळोवेळी वेग-वेगळया स्वरूपात एकुण १०,४५,५३०/- रूपये रक्कम बँकेतील खातेदाराचे नावावर जमा करवुन घेऊन,फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) शिंदे ८३८००७१९६२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**